ePaper

## फरारी आरोपींची मालमत्ता जप्त करा : देशमुख हत्याप्रकरणी मुख्यमंत्र्यांचे आदेश




|| वर्ष - 8 | अंक -170 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 29 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


### आतील पानांत


- रोहितची कारकीर्द संपुष्टात येईल
- नितीश रेड्डीचं कुटुंब झालं भावुक!
- पहिल्या शीख पंतप्रधानांचा अपमान!
- मुंडेंना कॉंग्रेस प्रवेश करता आला नाही


### रसायनमिश्रित पाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट नदीपात्रात

# पवित्र इंद्रायणी नदी पुन्हा फेसाळली!

## नागरिकांची वारंवार उपोषणे व आंदोलने करूनही आळंदीकरांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

| आळंदी | महाईन्यूज

**तीर्थक्षेत्र आळंदीतील पवित्र इंद्रायणी नदी मागील दोन दिवसांपासून पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात फेसाळली आहे. रसायनमिश्रित पाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट नदीपात्रात सोडणे, मैलामिश्रित पाणी नदीत सोडणे अशा वेगवेगळ्या कारणांमुळे इंद्रायणी नदी प्रदूषणाच्या विळख्यात अडकली आहे. विशेष म्हणजे थेट अधिवेशनात इंद्रायणी जलप्रदूषणाचा मांडलेला मुद्दा, नागरिकांची वारंवार उपोषणे व आंदोलने करूनही हा प्रश्न गांभीर्याने घेतला जात नाही.**



मागील अनेक दिवसांपासून इंद्रायणी नदी प्रदूषित होत आहे. औद्योगिक वसाहत क्षेत्रातून प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी पात्रात सोडले जात असलेले रसायनमिश्रित पाणी व सांडपाणी हे नदीतील पाणी प्रदूषणाचे मुख्य कारण आहे.
त्या पाण्यामुळे नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पांढराशुभ्र फेस निर्माण होत आहे. जुन्या बंधाऱ्याखालील नदीपात्रातील पाणी या पांढऱ्या शुभ्र तरंगणाऱ्या फेसाने झाकून जात आहे. अगदी पाण्यावर तरंगणारा फेस पाहून समक्षदर्शींना बर्फाच्छादित भागाची आठवण होत आहे. इंद्रायणीत रसायनयुक्त सांडपाण्यामुळे जलचर जीवांचे जीव धोक्यात आले आहे. तसेच इंद्रायणी नदीपात्रातील पाणी शेतपंपाद्वारे शेतीला नेले जाते. प्रदूषित पाणी विविध पिकांना दिले जाते. त्या प्रदूषित पाण्याचा पिकांवर दूरगामी परिणाम होतो. परिणामी ही पिके माणसांसह जनावरांच्या आरोग्यासाठी खाणे अपायकारक ठरत चालली आहेत. या नदीपात्राच्या प्रदूषित पाण्यामुळे जवळपास असणाऱ्या विहिरी, बोअर यांच्या पाण्यामध्ये परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. तर इंद्रायणीतील पाणी तीर्थ म्हणून प्राशन करणाऱ्या व त्यात स्नान करणाऱ्या वारकऱ्यांना पोटाचे विकार, तसेच त्वचाविकार देखील पसरण्याचा धोका संभवतो आहे. याबाबत नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

एकीकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने डोळ्यांवर पट्टी बांधली आहे, तर दुसरीकडे राज्य सरकार केवळ आश्वासनं देण्यावर धन्यता मानत आहे. इंद्रायणी नदीने मोकळा श्वास घ्यावा एवढीच स्थानिक जनता व वारकऱ्यांची माफक अपेक्षा आहे.

### उपाययोजना कागदावर...

हिवाळी अधिवेशनात तत्कालीन आमदार दिलीप मोहिते-पाटील यांनी इंद्रायणीच्या वाढत्या प्रदूषणाचा मुद्दा शासनासमोर लक्षवेधी करून मांडला होता. त्यावेळी मंत्री उदय सामंत यांनी इंद्रायणी नदीबाबत सकारात्मक पावले उचलणार असून इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करणार असल्याची ग्वाही दिली होती. मात्र, प्रत्यक्षात अद्यापही त्यावर उपाययोजना झालेली नाही. त्यामुळे केवळ कागदी घोडे नाचविण्यात प्रशासन मग्न असल्याच्या तीव्र प्रतिक्रिया स्थानिक जनतेकडून व्यक्त होत आहेत.

## ज्येष्ठ दिग्दर्शिका सई परांजपे यांना पद्मपाणी जीवनगौरव पुरस्कार

### दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मान्यवरांच्या हस्ते होणार प्रदान

| छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी : महाईन्यूज

जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठी रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली असून १५ जानेवारी ते १९ जानेवारी २०२५ या दरम्यान हा महोत्सव छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे. या महोत्सवात भारतीय




सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणी जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शिका, पटकथाकार, निर्मात्या, लेखिका व नाटककार पद्मभूषण सई परांजपे यांना जाहीर करण्यात आल्याची घोषणा महोत्सवाचे संस्थापक व संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम व महोत्सवाचे मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर यांनी केली आहे. पद्मपाणी पुरस्कार निवड समितीने सई परांजपे यांच्या नावाची निवड केली असून या समितीच्या अध्यक्षपदी लतिका पाडगांवकर (पुणे) तर सदस्यपदी चित्रपट दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, सुनील सुकथनकर व चंद्रकांत कुलकर्णी यांचा समावेश होता. पुरस्काराचे स्वरूप पद्मपाणी सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व दोन लक्ष रूपये असे आहे.

पद्मपाणी जीवनगौरव पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात १५ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता रुक्मीणी सभागृह, एमजीएम परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. तर महोत्सव पुढील पाच दिवस आयनॉक्स,प्रोझोन मॉल येथे संपन्न होणार आहे.

मागील चार दशकांहून अधिक काळापासून सई परांजपे या भारतीय सिनेजगतात कार्यरत असून त्यांनी दिग्दर्शित केलेल्या हिंदी सिनेमांनी भारतीय सिनेजगताला वेगळी ओळख प्राप्त करून दिली आहे. अतिशय भावस्पर्शी, मानवी नातेसंबंधांवर भाष्य करणारे सिनेमे त्यांनी दिग्दर्शित केलेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने स्पर्श (१९८०), चश्मेबद्दूर (१९८१), कथा (१९८३), दिशा (१९९०), चुडिया (१९९३), साज (१९९७) यांचा समावेश आहे.

# पुण्यातील सांडपाणी थेट नद्यांत!

## प्रदूषण नियंत्रण मंडळाचे महापालिकेवर कारवाईचे पाऊल

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते थेट नदीत सोडल्यामुळे जलप्रदूषण होऊन माशांचा मृत्यू झाल्याचा ठपका ठेवून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुणे महापालिकेला नोटीस बजावली आहे. महापालिकेचे शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प मंडळाची मंजुरी न घेता सुरू असल्याचेही उघडकीस आले आहे**



सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि नदी परिसराची मंडळाच्या आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली. त्या वेळी नदीच्या दोन्ही बाजूंना मृत मासे आढळून आले. याचबरोबर नदीसुधार योजनेची अंमलबजावणी सुरू असलेल्या ठिकाणी पाणी वाहते नसल्याचे निदर्शनास आले. 'नायडू सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या नजीक तीन नाल्यांमधून येणारे सांडपाणी थेट नदीत मिसळत आहे. यामुळे नदीतील माशांचा मृत्यू झाला आहे. नाल्यातील सांडपाणी काळ्या रंगाचे, दुर्गंधीयुक्त असून, त्याचे पीएच मूल्य ६ ते ७ आहे,' असे नोटिशीत म्हटले आहे. 'महापालिकेकडून रोज ९० एमएलडी (दशलक्ष लिटर प्रतिदिन) सांडपाणी प्रक्रिया न करता थेट मुळा आणि मुठा नदीत सोडले जात आहे.

याचबरोबर जुना नायडू सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पाडण्यात आला असला, तरी नवीन प्रकल्पाचे काम अद्याप पूर्ण झाले नसून, तो सुरू झालेला नाही. या प्रकल्पाला अजून वीज पुरवठ्याची पर्यायी सोय करण्यात आलेली नाही. महापालिकेचे शहरात विविध ठिकाणी ५६७ एमएलडी क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प असून, ते मंडळाच्या मंजुरीविना सुरू आहेत. या प्रकल्पांच्या मंजुरीची मुदत ३१ डिसेंबर २०२३ रोजी संपली आहे,' असे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.जलप्रदूषण केल्याप्रकरणी पुणे महापालिकेला नोटीस बजाविण्यात आली असून, नियमांची पूर्तता करून १५ दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. शहरातील १०० टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठीच्या दीर्घकालीन उपाययोजनांचा आराखडा सादर करण्याची सूचनाही महापालिकेला केली आहे. महापालिकेने नोटिशीला उत्तर न दिल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महापालिकेला पाठविलेल्या नोटिशीत मुळा आणि मुठासोबत इंद्रायणी आणि उल्हास या नद्यांचाही उल्लेख केला आहे. वास्तविक इंद्रायणी आणि उल्हास नद्या पुणे शहरातून वाहत नसतानाही त्यांच्या प्रदूषणासाठी मंडळाने महापालिकेला जबाबदार धरले आहे. मंडळाकडून नजरचुकीने हा उल्लेख झाला, की अन्य काही कारण आहे, याबाबत अधिकाऱ्यांनी मौन धारण केले आहे.

### नदीच्या दोन्ही बाजूंना मृत मासे

महापालिकेचा नायडू सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि नदी परिसराची मंडळाच्या आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली. त्या वेळी नदीच्या दोन्ही बाजूंना मृत मासे आढळून आले. याचबरोबर नदीसुधार योजनेची अंमलबजावणी सुरू असलेल्या ठिकाणी पाणी वाहते नसल्याचे निदर्शनास आले. 'नायडू सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या नजीक तीन नाल्यांमधून येणारे सांडपाणी थेट नदीत मिसळत आहे. यामुळे नदीतील माशांचा मृत्यू झाला आहे. 'महापालिकेकडून रोज ९० एमएलडी (दशलक्ष लिटर प्रतिदिन) सांडपाणी प्रक्रिया न करता थेट मुळा आणि मुठा नदीत सोडले जात आहे.

---

# राजगुरुनगरमध्ये कडकडीत बंद!

## चिमुरड्या मुलींवरील अत्याचाराचा निषेध!; न्यायासाठी निषेध मोर्चा

।राजगुरुनगर ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नराधमाला फाशी झालीच पाहिजे..... फाशी द्या फाशी द्या.... चिमुरड्यांना न्याय मिळालाच पाहिजे, अशा संतप्त घोषणेने राजगुरुनगर येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेच्या निषेधार्थ राजगुरुनगर वासियांनी आपले सर्व व्यवहार बंद ठेऊन पीडित कुटुंबाच्या न्यायासाठी निषेध मोर्चा काढला. या मोर्चात राजगुरूनगर सह पंक्रोशीतील नागरिक उस्फुर्तपणे सहभागी झाले होते.**

राजगुरुनगर येथे वास्तव्यास असलेल्या गरीब कुटुंबातील दोन अल्पवयीन मुली घराबाहेर खेळत असताना बेपत्ता झाल्या असल्याची तक्रार २५ डिसेंबर रोजी देण्यात आली होती. २६ डिसेंबर रोजी या मुलींचे मृतदेह एका पाण्याच्या बॅरल मध्ये आढळून आले. पोलिसांनी अधिक तपास केला असता जवळच असलेल्या एका बियर बार मध्ये काम करणाऱ्या अजय दास नामक परप्रांतीय नराधम कडून या अल्पवयीन मुलींचा खून व अत्याचार केल्याची घटना उघडीस आली होती. या घटनेचे पडसाद संपूर्ण शहर परिसरात उमटले होते. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या कृत्याने राजगुरुनगर शहरात संतापाची भावना व्यक्त होत होती.




मृत मुलींच्या नातेवाईकांनी आक्रोश करीत आरोपीस तात्काळ फाशी द्या,आमच्या ताब्यात द्या अशी मागणी करीत खेड पोलीस स्टेशन समोर गोसावी समाजाने ठिय्या आंदोलन सुरू केले होते. या गरीब कुटुंबाच्या पाठीशी उभे राहण्यासाठी राजगुरुनगर मधील सर्व समाजसेवी संस्था,संघटना राजकीय पुढारी एकटवले,

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पीडित कुटुंबाची भेट घेऊन शासनाकडून आर्थिक मदत देऊन न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले. आम्ही राजगुरुनगर च्या वतीने पीडित कुटुंबाला न्याय मिळण्यासाठी घटनेच्या निषेधार्थ राजगुरुनगर बंद च्या आवाहनाला राजगुरुनगर वासियांनी उत्फुर्त प्रतिसाद देत शनिवारी सकाळ पासून आपले व्यवहार बंद ठेवून निषेध मोर्चात सहभागी झाले होते.

चिमुरड्यांना न्याय मिळालाच पाहिजे,नराधमाला फाशी झालीच पाहिजे,फाशी द्या फाशी द्या अशा घोषणेने हुतात्मा राजगुरू ,भगतसिंग सुखदेव यांच्या स्मृती स्थळापासून निघालेला निषेध मोर्चा शहरातून तहसीलदार कार्यालय जवळ येऊन निषेध सभा घेऊन संपन्न झाला.या निषेध मोर्चात सर्व समाजातील राजकीय,सामाजिक,शैक्षणिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी समाजसेविका सुधा कोठारी, विजया शिंदे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अतुल देशमुख, शिवसेना शिंदे गटाचे भगवान पोखरकर,काँग्रेसचे विजय डोळस, समाज सेवक कैलास दुधाळे,आदींनी संतप्त भावना व्यक्त करून या घटनेचा निषेध केला. यावेळी हुतात्मा राजगुरू फाऊंडेशन अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर,सचिव अमर टाटीया , राजमाला बूट्टे पाटील,अंकुश राक्षे,नाझनिन शेख,वामन बाजारे,दिलीप होले,रेखा क्षोत्रीय,उर्मिला सांडभोर, व शहरातील अनेक जण यादरम्यान उपस्थित होते.

> सदरचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा अशी मागणी करण्यात आली आहे. पीडितांच्या न्यायासाठी दोन दिवस आम्ही उपोषण केले मात्र यामुळे प्रश्न सुटणार नाही. अनेक पालक दहशतीच्या छायेखाली आहेत. न्याय मिळावा एवढीच अपेक्षा आहे.
>
> -संजय कदम अध्यक्ष, भटके विमुक्त समाज

> मुख्यमंत्री निधीतून सहायत्ता निधी साठी प्रस्ताव पाठविलेला आहे. समाज कल्याण च्या माध्यमातून मनोधर्या योजनेतून संबंधितांना मदत करणार असल्याचे यावेळी सांगितले.
>
> -ज्योती देवरे

## आमदार शंकर जगताप यांचा पुढाकार

# वाकड-हिंजवडी रस्त्यावरील कोंडी सुटणार!

### वाहन चालक नागरिकांसाठी गंभीर समस्या, प्रत्यक्ष पाहणी करून संभाव्य उपाययोजनांची मागणी

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड हे महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणारे शहर असून, येथील वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण पडत आहे. या पार्श्वभूमीवर वाकड-हिंजवडी रस्त्यावरील वाहतूक कोंडी हा नागरिकांसाठी गंभीर विषय ठरला आहे. आमदार शंकर जगताप यांनी पोलीस प्रशासन आणि महानगरपालिका अधिकारी यांच्यासमवेत प्रत्यक्ष पाहणी करून संभाव्य उपाययोजना ठरवल्या.**








निवडणूक जाहीरनाम्यामध्ये वाहतूक व्यवस्थापनाबाबत मी आग्रही भूमिका घेणार असल्याचे नमूद केले होते. त्याच अनुषंगाने काल वाकड-हिंजवडी रस्त्यावरील, कस्तुरी चौक , काळा खडक चौक , विनोदे नगर , सोनेस्ट टॉवर चौक , श्रीराम चौक , भूमकर चौक येथे वाहतूक कोंडीची 'बॉटल नेक' परिस्थिती सोडविण्यासाठी नागरिकांसह , स्थानिक व्यापाऱ्यांशी संवाद साधत प्रत्यक्ष पाहणी करून उपाययोजना सुचवल्या, असे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले. शहराच्या वाहतुकीला जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांनी सुसज्ज करण्यासाठी मल्टिलेव्हल इल्हीवेटर ब्रिज आणि अंडरपास निर्माणाचे प्रस्ताव तयार करण्यात येतील असा विश्वास त्यांनी नागरिकांना दिला. वाहतूक सुरळीत करण्यासाठी रस्ते रुंदीकरण, वाहतूक सिग्नल यंत्रणा सुधारणा आणि वाहतूक पोलिसांची तैनाती वाढविणे हे आमचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.काही महत्त्वाच्या रस्त्यांवर एकमार्गी वाहतूक यंत्रणा अमलात आणल्याने वाहतूक सुरळीत होईल तसेच योग्य नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे वाकड-हिंजवडी रस्त्यावरील वाहतूक कोंडी निश्चित सुटेल आणि आपल्या पिंपरी-चिंचवड शहराचा विकास अधिक वेगाने होईल. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

#### पोलीस अधिकारी, पदाधिकाऱ्यांची उपस्थिती...

यावेळी पोलीस उपायुक्त बांगर साहेब , शहर अभियंतानिकम साहेब , पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्या प्रा. भारतीताई विनोदे , एस.पी.पिंजण साहेब, सुर्यवंशी साहेब, प्रदेश सदस्य संतोष कलाटे, मा. नगरसेवक संदीप कस्पटे, मंडल अध्यक्ष प्रसाद कस्पटे, राम वाकडकर संकेत चोंधे, श्रीनिवास कलाटे, सुरज भुजबळ, सुदेश राजे, तेजस्विनीताई ढोमसे, प्रमोद भुजबळ यांच्यासह महापालिका अधिकारी, सोसायटीचे सदस्य आणि परिसरातील नागरिक आदी उपस्थित होते.

---

## बिल भरा, विलंब दंड टाळाच्या 'एसएमएस'चा भडीमार!

### घरोघरी देयकांचे वितरण झाल्याचा अधिकाऱ्यांचा दावा

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चालू आर्थिक वर्ष (२०२४-२५) संपण्यास अवघे तीन महिने बाकी असतानाही पिंपरी-चिंचवड महापालिकेचा करआकारणी व करसंकलन विभाग मालमत्ताधारकांना देयकांचे घरपोच वितरण करण्यात अपयशी ठरला आहे. कर भरण्यासाठी मालमत्ताधारकांच्या भ्रमणध्वनीवर (मोबाईल) संदेशाचा (एसएमएस) मारा केला जात असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. दुसरीकडे घरोघरी देयकांचे वितरण झाल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे.**




महिला बचत गटांच्या माध्यमातून महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून घरोघरी, दुकाने आणि आस्थापनांवर जाऊन मालमत्ता करांच्या देयकांचे वितरण करण्यात येते. त्यासाठी एका देयकामागे महापालिका २० रुपये शुल्क देत आहे. त्याकरिता महिलांना प्रशिक्षणही देण्यात आले आहे. एप्रिल आणि मे २०२४ या दोन महिन्यांत शंभर टक्के देयके वितरित झाल्याचा दावा करसंकलन विभागाने केला आहे. मात्र, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील नऊ महिने संपत आले तरी, अद्याप मालमत्ताधारकांना देयके मिळाली नाहीत. त्यामुळे नेमके किती देयक आहे, हे त्यांना समजले नाही. असे असताना करसंकलन विभागाकडून दररोज भ्रमणध्वनीवर संदेशाचा मारा केला जात आहे. मालमत्ताधारकांच्या भ्रमणध्वनीवर देयक भरा, विलंब दंड टाळा, देयक न भरल्यास जप्तीपूर्व नोटीस दिली जाईल, मालमत्ता जप्त केली जाईल, असे संदेश येत आहेत. मात्र, हातात देयक नसल्याने ते नागरिकांना भरता येत नाही. चिंचवड स्टेशन आणि पिंपळे गुरव भाग, तसेच शहरातील अनेक भागांत देयकांचे वाटप झाले नसल्याच्या तक्रारी येत आहेत. गेली तीन वर्षे घरी देयक आले नाही. त्यामुळे किती मालमत्ताकर भरायचा आहे, हे समजले नाही. त्या संदर्भात संबंधित विभागीय कार्यालयाकडे तक्रार केली आहे. मात्र, त्याची कोणी दखल घेत नाही, असे सदनिकाधारक प्रशांत जंगम यांनी सांगितले.

देयकांचे वितरण झाले आहे. देयक आले नसेल, तर मालमत्तेचा मिळकत कर क्रमांक माहिती असल्यास महापालिकेच्या http://www.pcmcindia.gov.in संकेतस्थळावर देयक उपलब्ध होते. ऑनलाइन देयक भरणे सुलभ आणि सुरक्षित आहे. देयक भरल्यानंतर संदेश येत असतील, तर त्याची तपासणी केली जाईल, असे करसंकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

---

## ई-रिक्षाधारकांना मिळणार ३० हजार रुपये अनुदान



। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

शहरातील वायुप्रदूषण कमी करून पर्यावरणाचा समतोल राखणे,ई-वाहन वापर धोरणाला चालना देण्यात येत आहे. महापालिकेने राबविलेल्या ई वाहन धोरणांतर्गत आयुक्तांच्या हस्ते ई रिक्षाधारकांना अनुदान धनादेश देण्यात आले.

#### पहिल्या 1500 रिक्षाधारकांना मिळणार लाभ

शहरातील वायुप्रदूषण कमी करून पर्यावरणाचा समतोल राखणे, ई-वाहन वापर धोरणाला चालना देण्यात येत आहे. महापालिकेने राबविलेल्या ई वाहन धोरणांतर्गत आयुक्तांच्या हस्ते ई रिक्षाधारकांना अनुदान धनादेश देण्यात आले. शहरातील जास्तीत जास्त ई-रिक्षाधारकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक धोरण २०२१' राबवण्याबाबत मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने शहरातील वायुप्रदूषण कमी करणे तसेच ई-वाहन धोरणाला चालना देणे, ई-वाहन वापरण्यासाठी लोकांना प्रोत्साहन देणे यासाठी महापालिकेतर्फे ई-रिक्षाधारकांना अनुदान देण्यात येत आहे. महापालिका भवनात ई-रिक्षाधारकांना धनादेश वितरण करण्याचा कार्यक्रम पार पडला.

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा- एक चळवळ



भूमिका

**भारत हा तरुणांचा देश असला तरी तरुणांमधून वाचन संस्कृती लोप पावत आहे. महाविद्यालयातील ग्रंथालयांमध्ये अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर पुस्तके उपलब्ध असतात मात्र ती वाचण्याची ओढ विद्यार्थ्यांमध्ये दिसत नाही. वाचन संस्कृतीची जागा मोबाईल संस्कृतीने घेतल्याने विद्यार्थ्यांनी पुस्तकांकडे पाठ फिरवली.**

परिणामी थोरांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त त्यांचे बौद्धिक स्मरण करणाऱ्यांची संख्याही दिवसेंदिवस कमी होत आहे. वाचन कमी असल्याने वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी झाले. त्याची दखल घेतं पुस्तक वाचून त्याचं परीक्षण व सादरीकरण करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये वाढविण्याकरिता महाराष्ट्राच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने १ ते १५ जानेवारी दरम्यान 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा ' हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला.माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्यादिवशी वाचन उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यात भर पडावी म्हणून महाराष्ट्रातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीकरिता राज्यस्तरीय, विभागस्तरीय, जिल्हास्तरीय आणि महाविद्यालयीन स्तरीय समिती गठीत करण्याचे निर्देश आहेत.



या उपक्रमांतर्गत वाचन कौशल्य कार्यशाळा, पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धा, सामूहिक वाचन, वाचन संवाद असे काही उपक्रम राबविण्याच्या सूचना आहेत. एक पुस्तक वाचून त्यावर किमान ५०० शब्दांचे परीक्षण किंवा पाच मिनिटांचे सादरीकरण घेऊन त्यांच्यामध्ये आवड निर्माण करावयाची आहे. याकरिता महाविद्यालयांमध्ये वाचनीय पुस्तकांची यादी प्रसिद्ध करून विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून द्यावी लागणार आहेत. विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्याकरिता या स्पर्धेतील विजेत्यांचा समावेश महाविद्यालयाच्या वार्षिक अंकात करून त्यांना २६ जानेवारी रोजी पारितोषिक देऊन सन्मानित करणे अपेक्षित आहे. विद्यापीठे, महाविद्यालयातील ग्रंथालयांबरोबरच सार्वजनिक ग्रंथालये आहेत. सार्वजनिक ग्रंथालयाची स्थिती सुद्धा फारशी समाधानकारक नाही. तिथेही वाचकांचा अभाव दिसतो. या पंधरवड्यानिमित्ताने सार्वजनिक ग्रंथालयांनी पुस्तक प्रदर्शन आयोजित करून त्यांचाही सहभाग घेऊन उपक्रमाची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न केला.

वाचन कमी झाल्याने लेखन कमी झाले. परिणामी दर्जेदार पुस्तकांची मेजवानी देणारे लेखक कमी होत आहेत. वाचक आणि लेखक कमी झाल्याने पुस्तक प्रकाशन व्यवसाय मंदावला. महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र ग्रंथालय बंधनकारक असून स्वतंत्र कर्मचारी वर्ग आहे. मात्र महाविद्यालयांकडे पुस्तके खरेदीसाठी अनुदान नसल्याने पुस्तके खरेदी कमी झाली. अभ्यासक्रमाची पुस्तके विकत घेण्याची आर्थिक सोय नसल्याने नवीन संदर्भ ग्रंथांची खरेदी आपोआपच कमी झाली. वाचन संकल्प खरोखरच पूर्ण करायचा असेल तर महाविद्यालयीन ग्रंथालयांना अनुदानाची विशेष व्यवस्था करावी लागेल. ग्रंथालयात जी काही जुनी पुस्तके आहेत ती विद्यार्थी वाचत नसल्याने धुळखात असतात. आधुनिक युगात विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी बदलल्यात. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांनी ग्रंथालयांकडेच पाठ फिरवली.

भारत साहित्याची खाण आहे असे म्हटले जाते. साहित्यातून समाजसुधारक घडलेत. समाजसुधारकांच्या साहित्यातून समाजाला दिशा मिळते. वाचन ही एक कला आहे. वाचन माणसाला माणुसकी शिकविते. जीवनाला एक दिशा देते. पुस्तक विचार करायला शिकविते, अंतर्मुख करते. म्हणूनच 'वाचाल तर वाचाल ' असे म्हटले जाते. वाचल्याने व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. व्यक्तीस संवाद साधण्याचा मार्ग मिळतो. पुस्तके सृजनशीलता आणि चातुर्य शिकविते. पुस्तके विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि भावनिक वाढीची गुरुकिल्ली आहे. म्हणूनच 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा केवळ एक उपक्रम नसून ती चळवळ बनवणे काळाची गरज आहे. या चळवळीची यशस्विता प्राध्यापकांच्या प्रयत्नांवर अवलंबून आहे. तरुण पिढीला भारताची संस्कृती, गौरवशाली परंपरा, इतिहास, सामाजिक न्यायाचे विचार, धार्मिक आणि सामाजिक चौकट, राष्ट्रबांधणी आणि राष्ट्रउभारणीचे धडे, संवैधानिक मूल्ये पुस्तकांमधूनच मिळतात.

## संपादकीय »

### सुरम्यशी मनपहाट!

***आपल्याला हे सुंदर जीवन मिळालं, एक बहुमूल्य भेट म्हणून! उत्पत्ती,वाढ नि विस्ताराचा निर्मळ शुभाशीष म्हणून हे जीवन लाभलं.***

खरंतर याप्रती नेहमी कृतज्ञ असणंच,मानव म्हणून साजेसं होतं; पण असं सहजंच कुठ घडतं? सुप्त अहंकाराचा नेमका वारा लागलाच,कुठल्यातरी बेसावध क्षणी. ही अवधी सृष्टी उत्क्रांत होत असताना मानवानं टिकून ठेवला आपला तथाकथित नेहमीचा अग्रक्रम. झाडे-वेली,पशु-पक्षी नि सभोवारचं हे अवघं विलोभनीय चराचर,मानवाच्या या राजस अहंकाराला जोजावत आलं अन् त्यानं कधीकधी दिला निर्वाणीचा नितळ इशाराही, अजून वेळ गेली नसल्याचा! पण मानव कुठे एकतोय असा दृढ गामी इशारा? खरंतर, जन्म हाच असतो गंभीर इशारा,मृत्यूच्या शाश्वत नि सनातन अशा अस्तीत्वाचा! सांदीकोपऱ्यातली दृश्यप्राप्य, निगृह जळमटं निखंदून काढता यायला हवीत, लेवकाच सहयतेनं, या प्रिय इंद्रियांना साबूत ठेवता यायला हवं, आपलं विवेकी लोभसपण, कुठल्याही निसरड्या वाटेवरून स्खलीत न होण्याच्या निग्रही प्रशिक्षणानं!

**डॉ. पंजाबराव देशमुख हे नाव भारतीय कृषीक्षेत्र, शिक्षण आणि सामाजिक सुधारणा यामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांचे जीवन म्हणजे परिश्रम, कर्तृत्व, आणि समाजसेवेसाठी समर्पित असलेल्या नेतृत्वाचे सर्वोत्तम उदाहरण आहे. त्यांच्या कार्यामुळे त्यांना " भारतीय शेतकऱ्यांचे कैवारी " म्हणून ओळखले जाते.**

# समाजसेवा आणि नेतृत्व यांचा त्रिवेणी संगम

शिक्षण, समाजसेवा, आणि नेतृत्व यांचा त्रिवेणी संगम त्यांच्या जीवनात स्पष्टपणे दिसून येतो .... डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील पापळ या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला. शिक्षणाच्या प्रवासात त्यांनी अनेक अडचणींवर मात केली. प्राथमिक शिक्षण पापळ आणि हिंगणघाट येथे घेतल्यानंतर, त्यांनी उच्च शिक्षणासाठी मोठ्या जिद्दीने प्रयत्न केले. त्यांचे शालेय जीवन अत्यंत खडतर होते , पण त्यांनी शिक्षणाला कधीच मागे टाकले नाही .... पंजाबरावांनी इंग्लंडच्या कॅम्ब्रिज विद्यापीठातून शिक्षण घेतले आणि पीएच.डी. पदवी मिळवणारे ते भारतातील पहिले कृषी शास्त्रज्ञ ठरले. त्यांनी कायद्याचे शिक्षणही घेतले आणि वकील झाले. या उच्च शिक्षणाने त्यांना केवळ ज्ञान दिले नाही, तर भारतीय समाजाच्या प्रश्नांची मुळातून उकल करण्याचे भान दिले .... शिक्षण संपल्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण जीवन शेतकरी, ग्रामीण जनता, आणि



मागासलेल्या समाजाच्या उन्नतीसाठी समर्पित केले. भारतातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. त्यांनी " भारतीय कृषी परिषदे " (INDIAN COUNCIL OF AGRICULTURAL RESEARCH) मध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आणि कृषी शिक्षणाचा पाया मजबूत केला .... " कृषी विद्यापीठे " स्थापन झाली. डॉ. देशमुख यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख झाली आणि त्यांनी पारंपरिक शेतीत सुधारणा करण्यास सुरुवात केली .... डॉ. पंजाबराव देशमुख यांनी महिला सबलीकरण आणि बालकल्याण यासाठीही महत्त्वाचे कार्य केले. ग्रामीण भागातील स्त्रियांना शिक्षण आणि आरोग्यसेवा मिळवून देण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम सुरू केले .... डॉ. पंजाबराव देशमुख हे केवळ एक समाजसेवक नव्हते, तर कुशल राजकारणी आणि आदर्श नेतृत्व करणारे व्यक्तिमत्त्व होते. १९५२ साली ते स्वतंत्र भारताचे पहिले कृषी मंत्री झाले. या पदावर राहून त्यांनी भारताच्या कृषी धोरणांमध्ये मूलगामी बदल घडवून आणले. त्यांच्या नेतृत्वाखाली " शेतकरी सुधारणा कायदा " लागू करण्यात आला, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा हक्क मिळाला. त्यांनी हरित क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, ज्याचा फायदा भारतीय कृषी व्यवस्थेला झाला. त्यांच्या कार्यकाळात भारताने कृषी उत्पादनात आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने पावले उचलली. शिक्षण, समाजसेवा आणि नेतृत्व यांचा त्रिवेणी संगम म्हणजेच डॉ. पंजाबराव देशमुख हे होत ....डॉ. देशमुख यांच्या कार्यातून शिक्षण, समाजसेवा, आणि नेतृत्व यांचा अप्रतिम समन्वय दिसतो. शिक्षणाच्या जोरावर त्यांनी आपली क्षमता वाढवली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तोपर्यंत धनंजय मुंडेंचं मंत्रिपद काढून घ्या!

## मुंडे रडारवर-फरार आरोपींची संपत्ती जप्त करा : फडणवीस

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे देण्यात आलेला आहे. त्यानंतर आता या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसदेखील ॲक्शन मोडवर आले आहेत. देशमुख हत्याकांडातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले आहेत. बीडमधील शस्त्र परवान्यांबद्दली त्यांनी महत्त्वाचे आदेश दिले आहेत.**



बीडमध्ये आज सर्वपक्षीय आक्रोश मोर्चा काढण्यात आलेला होता. त्यात भाजपचे आमदार सुरेश धस, राष्ट्रवादी काँग्रेस शपचे आमदार जितेंद्र आव्हाड, संदीप क्षीरसागर, माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, खासदार बजरंग सोनावणे, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील उपस्थित होते. देशमुख हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करण्याची मागणी सगळ्याच उपस्थितांनी केली. मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे या सगळ्या नेत्यांच्या रडारवर होते. धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड या प्रकरणात आरोपी आहे. पण तो अद्याप फरार आहे. १९ दिवस झाले तरीही त्याला अटक झालेली नाही. दुसरीकडे कराडशी संबंधित अनेकांचे व्हिडीओ, फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. कराडच्या जवळच्या अनेकांच्या हातात बंदुका, पिस्तुलं दिसत आहेत. काहीजण गोळीबार करताना दिसत आहेत. या सगळ्यांची दखल फडणवीस यांनी घेतली आहे. फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीसांनी दिले आहेत. जप्तीची प्रक्रिया तातडीनं सुरु करण्याच्या सूचना सीआयडीचे अतिरिक्त महासंचालक बुरडेंना देण्यात आल्या आहेत. बंदुकीसोबत ज्यांचे फोटो, व्हिडीओ व्हायरल झाले आहेत, त्यांच्या परवान्यांचा फेरआढावा घेऊन परवाने रद्द करण्याचे आदेश फडणवीस यांनी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांना दिले आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्याकडून गेल्या काही दिवसांपासून सातत्याने बीड जिल्ह्यामध्ये गन कल्चर सुरू असल्यावरून सरकारला लक्ष्य केले जात आहे. ट्विटच्या माध्यमातून अनेक फोटो आणि व्हिडिओ अपलोड केले आहेत. यावरून बीडमध्ये मिशाही न फुटलेल्या पोरांसोरांच्या हाती बंदूक दिसून येत आहेत. खंडणीखोर फरार वाल्मिक कराडच्या मुलाचाही त्यांनी फोटो पोस्ट केला असून त्याच्याही कमरेला बंदूक दिसून येत आहे. यानंतर आता देवेंद्र फडणवीस यांनी कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. अंजली दमानिया यांनी केलेल्या दाव्यानुसार बीड, परभणी, अमरावती या ठिकाणी सर्वात जास्त परवाने दिल्याचे म्हटलं आहे. बीड जिल्ह्यामध्ये तब्बल १ हजार २८१ जणांकडे शस्त्र परवाना आहे. दरम्यान, परवाना देताना सर्व प्रकारची शहानिशा करूनच परवाना दिला जातो. यावेळी गुन्हेगारी पार्श्वभूमी सुद्धा तपासली जाते. मात्र बीड जिल्ह्यामध्ये टपरी पोरं सुद्धा ज्या पद्धतीने बंदूक कमरेला लावून फिरत आहेत त्यावरून पोलिसांनी खेळण्यातील बंदूक दिल्याप्रमाणे परवाने दिले आहेत का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. बीडमध्ये तीन दिवसांपूर्वी कैलास फडला अटक केली आहे. त्याचाही हवेत गोळीबार करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना अद्याप अटक झालेली नाही. खंडणी प्रकरणातून देशमुख यांची हत्या झाली. खंडणी प्रकरणी वाल्मिक कराडचं नाव आलेलं आहे. पण त्याला अटक झालेली नाही. कराड हा धनंजय मुंडेंचा अतिशय जवळचा मानला जातो. त्यामुळेच त्याला वाचवलं जात असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे कराडला पोलीस संरक्षण होतं. त्यातून तो फरार झाल्यानं आश्चर्य व्यक्त होत आहे. मोर्च्यात बोलताना भाजपा आमदार सुरेश धस यांनी जोरदार फटकेबाजी करत मंत्री धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. सुरेश धस म्हणाले की, सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. ही पद्धत चुकीची आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानानुसार कोणालाही मुंगी मारण्याची परवानगी नाही. संतोष देशमुख तीन टर्मचा सरपंच होता. दोनदा जनतेतून निवडून आला आणि एक वेळा बॉडीतून निवडून आला होता, असे सुरेश धस म्हणाले. धनु भाऊ तुम्ही १ लाख ४२ हजार मतांनी निवडून आलात. ३३० बुथपैकी २३० बुथ ताब्यात असतील तर हेच होणार. तुम्ही बोगस मतांनी जिंकून आले आहे, असा आरोप देखील यावेळी बोलताना सुरेश धस यांनी केला. पंकजा मुंडे यांच्यावर टीका करत सुरेश धस म्हणाले की, पंकूताई माझा सवाल आहे की, तुम्ही संभाजीनगर एअरपोर्टला उतरला. १२ डिसेंबर गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीचा दिवस आहे.

### उद्या तुमचं घरं जळेल

प्रत्येक भाषणात जातीचा उल्लेख दिसतोय, इतक्या वर्षात राजकारण पाहून माझ्या मनाला वाईट वाटतं. तुम्ही वाल्मिक का म्हणता? हा वाल्मिक नाही वाल्या आहे. वाल्याचा वाल्मिकी झाला होता पण इथ वाल्मिकीचा वाल्या झालाय. हा शिवराज बांगर, याच्यावर किती गुन्हे वाल्याने दाखल केले विचारा, हा घरात कमी आणि कोर्टात जास्त असतो. बीडच्या परिस्थितीला पालकमंत्री आणि पोलीस जबाबदार आहेत. इथला प्रत्येक अधिकारी धनंजय मुंडेलाच विचारून करणार असल तर कशी हिंमत होईल, असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला आहे. या आमच्या ताई यांचा कोणाला विचार आहे? यांचं पुसलेले कुंकू कोण परत आणणार? कुठून आणल तुम्ही राजकारण? उद्या तुमचं घरं जळेल तेव्हा कोणीही येणार नाही.

# मुंडेंना काँग्रेस प्रवेश करता आला नाही

## अजित पवारांनी सांगितला मनमोहन सिंगांच्या मोठेपणाचा किस्सा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय अर्थव्यवस्थेला उदारीकरणाची दिशा दाखवून विकासाच्या वाटेवर नेणारे ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व' अशा भावनांनिशी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना देशातील विविध क्षेत्रांतून तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून शुक्रवारी आदरांजली वाहण्यात आली.**

डॉ. सिंग यांच्यावर आज, शनिवारी सकाळी ११.४५ च्या सुमारास दिल्लीतील निगमबोध घाट येथे लष्करी तसेच शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. सिंग यांच्या निधनाचा शोक म्हणून १ जानेवारीपर्यंत सर्व सरकारी कार्यालयांसह दूतावासांवरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर ठेवण्याचे सरकारने जाहीर केले आहे. जगभरातील नेत्यांनी, अर्थ क्षेत्रातील तज्ज्ञांनी, भारतातील पुढाऱ्यांनी देखील मनमोहन सिंग यांना आदरांजली वाहिली. त्यांच्या सहकाऱ्यांनी व विरोधकांनी देखील त्यांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील मनमोहन सिंग यांना आदरांजली वाहिली आहे. दरम्यान, अजित पवारांचा एक व्हिडीओ सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. एबीपी माझा या वृत्तवाहिनीला दिलेल्या एका मुलाखतीवेळी अजित पवारांनी डॉ. मनमोहन सिंग यांचा एक किस्सा सांगितला होता. हा किस्सा समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. अजित पवार म्हणाले होते की "गोपीनाथ मुंडे यांनी देखील भाजपा सोडण्याचा निर्णय घेतला होता. त्यांच्याबरोबर पाच आमदार होते. त्यामध्ये पाशा पटेल, प्रकाश शेंडगे, माधुरी मिसाळ, पंकजा मुंडे आणि अजून कोणीतरी होतं. दिल्लीत त्यांचा पक्षप्रवेश होणार होता. गोपीनाथ मुंडेंसह इतर सर्वजण काँग्रेसमध्ये प्रवेश घेणार होते.

सर्व काही ठरलं होतं. दिल्लीत नियोजन झालं होतं. मनमोहन सिंग हे त्यावेळी भारताचे पंतप्रधान होते. काही वरिष्ठांनी पंतप्रधानांच्या कानावर ही गोष्ट घातली. तेव्हा मनमोहन सिंग यांनी त्या पक्ष प्रवेशाला विरोध केला.



### मनमोहन सिंगांच्या आठवणी...

"मी पंतप्रधान असताना लोकसभेतील भाजपाच्या (विरोधी पक्ष) उपनेत्याला अशा प्रकारे काँग्रेसमध्ये प्रवेश दिलेला मला चालणार नाही. अशा पद्धतीने विरोधी पक्ष फोडलेला मला चालणार नाही. त्यानंतर सर्वांना प्रश्न पडला की आता काय करायचं. सर्व तयारी झाली होती, नेत्यांच्या गाड्या पक्ष प्रवेशाच्या ठिकाणी आल्या होत्या. काँग्रेस नेते शशी थरूर यांनी देखील मनमोहन सिंग यांच्याबाबत एक किस्सा एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर शेअर केला आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की "मला कल्पना होती की डॉ. मनमोहन सिंग त्यांना दिवाळीत येणारे महागडे गिफ्ट्स आणि मिठाई परत पाठवत असत.

# पहिल्या शीख पंतप्रधानांचा अपमान!

## सर्व माजी पंतप्रधानांच्या प्रतिष्ठेचा आदर : राहुल गांधी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**माजी पंतप्रधान मनमोहन सिंग शनिवारी पंचतत्वात विलीन झाले आहेत. जागतिक ख्यातीचे अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी देशभरात लौकिक मिळवला होता. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे शासकीय इतमामात सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मुलीने त्यांना मुखाग्नी दिला. परंतु काँग्रेसचे रायबरेलीचे खासदार राहुल गांधी यांनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निगमबोध घाटावर अंत्यसंस्कारावर करण्यावरुन केंद्र सरकारला घेरले आहे.**



गुरुवारी २६ डिसेंबर रोजी मनमोहन सिंग यांचं निधन झाल्यानंतर शुक्रवारी सकाळी काँग्रेस पक्षाकडून केंद्र सरकारला स्मृतीस्थळासंदर्भात पत्र पाठवून विनंती करण्यात आली. केंद्राकडून स्मृतिस्थळासाठी जागा देण्यात न आल्याची तक्रार पक्षाकडून करण्यात आली. त्यावर शुक्रवारी रात्री केंद्र सरकारकडून स्मृतिस्थळासाठी जागा देण्याचं मान्य केल्याचं स्पष्ट करण्यात आलं. काँग्रेसकडून यासंदर्भात विनंती पत्र आलं असून त्यावर निर्णय घेण्यात आला आहे व तो काँग्रेस पक्षप्रमुख आणि डॉ. सिंग यांच्या कुटुंबीयांना कळवण्यात आला आहे, अशी माहिती गृहमंत्रालयानं दिली आहे.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या स्मृतिस्थळासाठी जागा दिली जाईल. पण त्यासाठी ट्रस्ट स्थापन करून पुढील कार्यवाही करावी लागेल. तोपर्यंत त्यांच्यावरील अंत्यसंस्कार व इतर बाबी करता येतील, असं केंद्राकडून सांगण्यात आलं आहे. इंडियन एक्स्प्रेसनं यासंदर्भातलं सविस्तर वृत्त दिलं आहे.राहुल गांधी यांनी एक्स हँडलवरील पोस्टमध्ये लिहिले आहे की, सध्याच्या सरकारने भारत मातेचे महान सुपुत्र आणि शीख समुदायाचे पहिले पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे अंत्यसंस्कार आज निगमबोध घाटावर करून त्यांचा अपमान केला आहे. ते एक दशक भारताचे पंतप्रधान होते, त्यांच्या काळात देश आर्थिक महासत्ता बनला आणि त्यांची धोरणे आजही देशातील गरीब आणि मागासवर्गीयांना आधार देत आहेत. राहुल गांधींनी केंद्र सरकारला घेरत पुढे लिहिले की, आजपर्यंत सर्व माजी पंतप्रधानांच्या प्रतिष्ठेचा आदर करून, अधिकृत समाधीस्थळावर त्यांचे अंतिम संस्कार करण्यात आले आहेत. जेणेकरून प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही गैरसोयीशिवाय त्यांना श्रद्धांजली वाहता येईल. डॉ. मनमोहन सिंग हे आमच्या सर्वोच्च आदराचे आणि समाधीस्थळासाठी पात्र आहेत.

देशाच्या या महान सुपुत्राबद्दल आणि त्यांच्या गौरवशाली समाजाबद्दल सरकारने आदर दाखवायला हवा होता. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे अंत्यसंस्कार अशा महत्वपूर्ण ठिकाणी व्हावेत, जिथे त्यांचे स्मारकही बांधले जावे, अशी पत्राच्या माध्यमातून विनंती केली होती. मनमोहन सिंग यांचे अंत्यसंस्कार आणि स्मारकासाठी जागा न मिळणे हा भारताच्या पहिल्या शीख पंतप्रधानांचा जाणीवपूर्वक केलेला अपमान असल्याचा आरोप पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केला होता. तर दुसरीकडे, केंद्रीय गृहमंत्रालयानेही सांगितले की, मनमोहन सिंग यांच्या स्मारकासाठी सरकार जागा देणार आहे.दरम्यान, काँग्रेसकडून मात्र वेगळी भूमिका मांडण्यात आली. ज्या ठिकाणी डॉ. मनमोहन सिंग यांचं स्मृतिस्थळ उभारलं जाईल, त्याच ठिकाणी त्यांच्यावर अंत्यसंस्कार व्हावेत, अशी मागणी काँग्रेसनं लावून धरली. अर्थात, अंत्यसंस्कारांच्या आधीच स्मृतिस्थळासाठी जागा निश्चित केली जावी, असा मुद्दा पक्षाकडून उपस्थित करण्यात आला. विशेष म्हणजे २०१३ साली यूपीए सरकारच्या काळात डॉ. मनमोहन सिंग यांच्याच उपस्थितीत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत दिल्लीतील जागेच्या अभावी स्मृतिस्थळांसाठी स्वतंत्र जागा न देता राज घाटावर एकच राष्ट्रीय स्मृती स्थळ बांधण्यात यावं, असा निर्णय घेण्यात आला होता.

### देश आर्थिक महासत्ता बनला

स्वतंत्र जागेसाठीची मागणी इतिहासातील काही संदर्भांनुसार पाहिली जात आहे. नेहरू-गांधी कुटुंबाच्या बाहेरच्या व्यक्तींना पक्षानं कधीही योग्य तो मान दिला नसल्याची टीका सातत्याने काँग्रेसवर झाल्याचं पाहायला मिळालं आहे. त्यात माजी पंतप्रधान दिवंगत पी. व्ही. नरसिंह राव यांच्याशी सोनिया गांधींचे कथित वाद आणि त्यानंतर काँग्रेसकडून नरसिंह राव यांच्याबाबत घेण्यात आलेली भूमिका या गोष्टी राजकीय वर्तुळात चर्चेत राहिल्या. २००४ साली त्यांचं निधन झालं. पण त्यांचं पार्थिव दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयाच्या आतही नेण्यात आलं नाही. त्यांच्या स्मृतिस्थळासाठी स्वतंत्र जागाही देण्यात आलेली नव्हती. अखेर निधनानंतर १० वर्षांनी एनडीए सरकारच्या काळात २०१५ साली त्यांचं स्मृतिस्थळ बांधण्यात आलं. दिल्लीतील एकता स्थल समाधी परिसरात त्यांचं स्मृतिस्थळ बांधण्यात आलं. याच वर्षाच्या सुरुवातीला केंद्र सरकारनं पी. व्ही. नरसिंह राव यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केलं.

---

# सूर्यवंशींच्या कुटुंबियांना 1 कोटीची भरपाई द्या

## ॲड. प्रकाश आंबेडकरांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांकडे मागणी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**परभणीत हिंसाचार झाल्यानंतर पोलिसांनी अनेकांची धरपकड केली. न्यायालयीन कोठडीत सोमनाथ सूर्यवंशींचा मृत्यू झाला. त्यानंतर वातावरण तापले. राहुल गांधी यांच्यासह अनेकांनी सूर्यवंशींच्या कुटुंबाला भेट दिली. तर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आज सकाळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.**



या भेटीत त्यांनी परभणी घटनेच्या संदर्भात महत्वाच्या मागण्या केल्या आहेत. परभणी प्रकरणातील पीडित सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना 1 कोटी रूपयांची भरपाई द्यावी अशीही मागणी ॲड. आंबेडकर यांनी केली. परभणी प्रकरणातील पीडित सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना 1 कोटी रुपये नुकसान भरपाई द्यावी; सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्या; परभणीत पोलीसांनी क्रूरतेने केलेल्या मारहाणीत बळी पडलेल्यांची यादी करण्यासाठी आणि पुरेशी भरपाई देण्यासाठी सर्वेक्षण करा; 1 जानेवारी रोजी होणाऱ्या भीमा कोरेगावच्या अभिवादन सोहळ्यापूर्वी फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांविरुद्ध कोणत्याही प्रकारचा हिंसाचार आणि चुकीची माहिती भडकावण्याच्या कोणत्याही प्रयत्नांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि ते हाणून पाडण्यासाठी पोलीसांना निर्देश द्यावेत; आदिवासी विद्यार्थ्यांसाठी थेट लाभ हस्तांतरण योजना रद्द करा आणि पूर्वीची प्रणाली पुन्हा सुरू करावी या मागण्या ॲड.आंबेडकर यांनी केल्या.

### 300 लोकांना ताब्यात घेतले

परभणीत पोलिसांनी क्रूरपणे केलेल्या मारहाणीत बळी पडलेल्यांची यादी करून त्यांना पुरेशी भरपाई देण्याची आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी डीबीटी रद्द करण्यासाठी सल्लामसलत करण्यासाठी, सर्वेक्षण करण्याची आमची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केली असल्याचे त्यांनी ट्विटर हँडलवरून स्पष्ट केले. 10 डिसेंबर रोजी परभणी जिल्हा रेल्वे स्थानकाजवळ संविधान प्रतिकृतीची विटंबना केली.पोलीसांनी 12 डिसेंबर रोजी सोमनाथ याच्यासह 300 लोकांना ताब्यात घेतले होते.

# मला ओळखत नाहीत त्यांनी शांत राहावे



गेल्या काही दिवसांपासून श्रुती हासनने तिचा बॉयफ्रेंड शंतनू हजारिकासोबत लग्न केल्याची अफवा पसरली होती. आता लग्नाच्या सततच्या बातम्यांदरम्यान, श्रुती आणि तिच्या प्रियकराने स्पष्टीकरण दिले आहे आणि अफवा पसरवणाऱ्यांना विशेष विनंती केली आहे. मंगळवारी संध्याकाळी लग्नाची बातमी आल्यानंतर श्रुती हासनने सोशल मीडियावर स्पष्टीकरण दिले आहे. तिने इंस्टाग्राम स्टोरीवर लिहिले आहे, माझे लग्न झालेले नाही. आयुष्याच्या प्रत्येक बाबतीत अगदी मोकळेपणाने बोलणारी माझ्यासारखी व्यक्ती लग्नाची गोष्ट का लपवेल? जे मला अजिबात ओळखत नाहीत त्यांनी शांत राहावे. श्रुतीचा प्रियकर शंतनू हजारिका याने सोशल मीडियावर लिहिले आहे, तुम्ही सर्वांनी शांत राहण्याची गरज आहे. आमचे लग्न झालेले नाही. जे लोक आम्हाला ओळखत नाहीत त्यांनी कृपया अफवा पसरवू नये. अलीकडेच ओरी ऊर्फ ओरहान अवतारमणीचे इंस्टाग्रामवर आस्क मी एनीथिंग सेशन होते. यादरम्यान एका चाहत्याने त्याला विचारले की, असा कोणी सेलिब्रिटी आहे का ज्याने तुमच्यासोबत फोटो क्लिक करण्यास नकार दिला आहे आणि उद्धटपणा दाखवला आहे. नाव घेता येत नसेल तर हिंट द्या. याला उत्तर देताना ओरीने श्रुती हासनचे नाव घेतले. तो म्हणाला, मी कधीच तिच्यासोबत फोटो क्लिक करायला सांगितले नाही, आम्ही एका कार्यक्रमात भेटलो, जिथे ती माझ्यासोबत खूप उद्धटपणे वागत होती. मी तिला ओळखतही नाही. मला खूप वाईट वाटलं. मला वाटतं काही गैरसमज झाला असावा कारण मी तिच्या पतीला चांगले ओळखतो आणि त्याला पसंत करतो. आमचा गैरसमज ताबडतोब दूर झाला, पण नंतर मला कळले की तिने मला प्यून किंवा स्पॉटबॉय म्हटले होते. ओरीने शंतनू हजारिकाला श्रुती हासनचा प्रियकर नव्हे तर नवरा म्हणून संबोधताच त्यांच्या लग्नाच्या बातम्या सुरू झाल्या. कारण ओरीने तो शंतनूचा मित्र असल्याचंही म्हटलं आहे. श्रुती हासन गेल्या ३-४ वर्षांपासून शंतनूसोबत रिलेशनशिपमध्ये आहे. शंतनू हा कलाकार आहे. आजकाल श्रुती हासन प्रभाससोबत सालार पार्ट-१: सीझफायर या चित्रपटात दिसत आहे. याशिवाय अभिनेत्री द आय आणि डकोइटमध्ये दिसणार आहे. हे दोन्ही चित्रपट 2024 मध्ये प्रदर्शित होणार आहेत.

## सलमानच्या बहुचर्चित 'सिकंदर'चा टीझर

अभिनेता सलमान खानच्या आगामी 'सिकंदर' या सिनेमाची त्याच्या चाहत्यांमध्ये खूप उत्सुकता आहे. चाहत्यांच्या लाडक्या भाईजानचा २०२४ मध्ये एकही सिनेमा प्रदर्शित झाला नाही. यामुळे सलमानचे चाहते या सिनेमाची आतुरतेने वाट पाहत आहेत. या सिनेमाचा टीझर सलमानच्या वाढदिवशी म्हणजेच २७ डिसेंबर २०२४ ला प्रदर्शित होणार होता. पण माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे याचे प्रदर्शन पुढे गेले होते. आता सलमानचा 'सिकंदर' सिनेमाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'सिकंदर'च्या टीझरच्या सुरुवातीला सलमान पाठमोरा दाखवला आहे. यात सलमान एका गूढ ठिकाणावरुन चालत चालत पुढे जाताना दाखवला आहे.

## पाळीतील त्रास ही समस्या



अभिनेता गोविंदा आणि सुनीता आहुजा यांची मुलगी टीना आहुजाने मासिक पाळीबद्दल वक्तव्य केलं आहे. तिच्या या वक्तव्याची सध्या खूप चर्चा होत आहे. टीनाने तिच्या आईबरोबर एक मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या आयुष्यातील विविध गोष्टींबाबत चर्चा केली. यावेळी तिने मासिक पाळीत होणाऱ्या त्रासाबद्दल तिचं मत मांडलं. मासिक पाळीच्या वेदना फक्त मुंबई आणि दिल्ली सारख्या शहरांमधील महिलांना होतात. लहान शहरांमध्ये महिलांना पाळी कधी येते, कधी जाते हेही माहीत नसतं. तसेच पिरियड क्रॅम्प्स हे मानसिक असतात असा दावाही तिने केला. टीना आहुजा म्हणाली, "मी चंदीगडमध्ये जास्त राहते आणि मी फक्त मुंबई आणि दिल्लीतील मुलींना पिरियड क्रॅम्प्सबद्दल बोलताना ऐकलं आहे. निम्म्या अडचणी तर या त्याबद्दल बोलतात, त्यातूनच उद्भवतात. कधीकधी ज्यांना पिरियड क्रॅम्प्स होत नाही, त्यांनाही ते मानसिकदृष्ट्या जाणवू लागतात. पंजाब आणि इतर लहान शहरांतील महिलांना मासिक पाळी कधी येते किंवा रजोनिवृत्ती कधी येते हेही माहीत नसतं. त्यांना पाळी आल्याचं जाणवत नाही."मासिक पाळीदरम्यान महिलांना जो त्रास होतो, त्याला महिलांच्या आहाराच्या सवयींना कारणीभूत असल्याचं मत टीनाने मांडलं. "मला मासिक पाळीत पाठदुखी होत नाही. मला क्रॅम्प्सही येत नाहीत. पण, मी बऱ्याचदा मुलींना त्याबद्दल बोलताना ऐकते. तुम्ही तूप खा, तुमचा

## ईशा कोप्पीकर अन् टीमी नारंग यांचा

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री ईशा कोप्पीकर ही आता वेगळ्याच कारणांमुळे चर्चेत आली आहे. तिचा आणि टीमी नारंग यांचा घटस्फोट झाल्याच्या बातम्यांना उधाण आले आहे. १४ वर्षांच्या सहजीवनानंतर त्यांनी वेगळं होण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे. बॉलीवूडची 'खल्लास गर्ल' म्हणून लोकप्रिय झालेल्या ईशा कोप्पीकरच्या या बातमीनं तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. टीमी आणि ईशा गेल्या १४ वर्षांपासून एकमेकांसोबत होते. त्यांना एक मुलगीही आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ईशा आणि टीमीनं गेल्या महिन्यातच घटस्फोट घेतला आहे. यासंबंधीची अधिक माहिती टाईम्स ऑफ इंडियानं देखील दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार ईशा ही तिच्या ९ वर्षांच्या मुलीसह टीमीचं घर सोडून दुसरीकडे राहण्यास गेली आहे. यापूर्वी ज्या काही बातम्या समोर आल्या होत्या त्यातून दोघांनी देखील हे नातं जपण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला मात्र त्यांच्यातील विसंवादामुळे ते नातं फार काळ टिकू शकलं नाही. त्यामुळे त्यांनी अखेर विभक्त होण्याचा निर्णय घेतला. ईशा आणि टीमीच्या लवस्टोरीविषयी सांगायचे झाल्यास त्यांनी एकमेकांना तीन वर्षांपर्यंत डेट केले होते. त्यानंतर २००९ मध्ये त्यांनी लग्न केले. ईशानं बॉलीवूड सोडून बिझनेसमध्ये करिअर करण्याचा निर्णय घेतला होता. तिच्या बॉलीवूड प्रोजेक्टविषयी सांगायचे झाल्यास, ईशा शेवटी अलयान नावाच्या तमिळ चित्रपटामध्ये दिसली होती. त्यापूर्वी तिनं लव यू लोकतंत्र, अस्सी नब्बे पुरे सौ, कवचा सारख्या चित्रपटांमध्ये देखील काम केले होते. तिच्या बच के रहना तू बच के रहना, खल्लास... नावाच्या गाण्यावर केलेला डान्स लोकप्रिय झाला होता. बॉलीवूडची 'खल्लास गर्ल' म्हणून लोकप्रिय झालेल्या ईशाच्या या बातमीनं तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे.

## प्रसिद्ध अभिनेत्री हिना खान रुग्णालयात



टीव्ही मनोरंजन आणि चित्रपट विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री हिना खान हिच्या चाहत्यांसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. ती म्हणजे तिला तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आली आहे. या घटनेनंतर चाहत्यांनी काळजी व्यक्त केली आहे. हिनानं आपल्या प्रकृतीबाबत सोशल मीडियावर पोस्ट शेयर करुन याबाबत माहिती दिली आहे. तिला मुंबईतील एका रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. हिनाला ताप आल्यानं तिला ॲडमिट करण्यात आल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.त्या फोटोंवर चाहत्यांनी कमेंट करत हिनाला काळजी घेण्यास सांगितले आहे. हिनानं तिच्या इंस्टा अकाउंटवरुन शेयर केलेला फोटो चाहत्यांच्या प्रतिक्रियांचा विषय आहे. हिनाला १०२ एवढा ताप असल्याचे तिनं म्हटले आहे. गेल्या चार रात्री मी काही झोपलेले नाही. मी तापानं खूप बेजार आहे. ताप काही कमी होण्याचे नाव घ्यायला तयार नाही. अशातच मला रुग्णालयात दाखल व्हावे लागले आहे. खूपच अशक्तपणा आला आहे. असेही हिनानं म्हटले आहे. हिनाच्या प्रोजेक्टविषयी पाहायचे झाल्यास तिचा कंट्री ऑफ ब्लाईंड नावाचा चित्रपट ऑस्करसाठी नॉमिनेट झाल्याचे बोलले जात आहे. त्यात तिनं केलेली भूमिका चाहत्यांच्या कौतुकाचा विषय आहे. या चित्रपटामध्ये अनुष्का सेन, शोएब निकाश शहा, नमिता लाल, इनाम उल हक, प्रद्युम्न सिंग मॉल आणि जितेंद्र राय यांच्या महत्वाच्या भूमिका आहेत.

# नितीश रेड्डीचं कुटुंब झालं भावुक!

## नितीश कुमार रेड्डीच्या शतकानंतर वडिलांना आनंदाश्रू

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नितीश रेड्डीने २१व्या वर्षी ऑस्ट्रेलियाविरूद्ध कसोटी शतक झळकावत आपलं पहिलं आंतरराष्ट्रीय शतक केलं आहे. नितीश रेड्डीने फक्त त्याचे शतकच पूर्ण केले नाही तर त्याने मेलबर्न कसोटीत भारताचं आव्हान कायम ठेवलं आहे. नितीश रेड्डी १०५ धावा करत नाबाद परतला आहे. तर वॉशिंग्टन सुंदरबरोबर त्याने शतकी भागीदारी रचत भारताची धावसंख्या ३५८ वर नेली आहे. नितीश रेड्डीला आंतरराष्ट्रीय कसोटी खेळताना पाहण्यासाठी त्याचं संपूर्ण कुटुंब ऑस्ट्रेलियामध्ये आहे. त्याच्या या शतकानंतर त्याचे आई,वडिल आणि बहिण भावुक होत आनंद साजरा करताना दिसले.**



नितीश रेड्डीच्या शतकाच्या वेळेस त्याचे वडिल आणि काक स्टेडियममध्ये उपस्थित होते. नितीशच्या प्रत्येक धावेवर त्याचे वडिल प्रार्थना करताना दिसले. नितीशने चौकार लगावत आपले शतक पूर्ण केले आणि त्याच्या वडिलांनी एकच जल्लोष केला आणि त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू तरळले. यानंतर खराब प्रकाशामुळे तिसऱ्या दिवसाचा खेळ थांबवण्यात आला. यानंतर त्याच्या वडिलांनी उर्वरित कुटुंबाची भेट घेतली आणि सर्वच भावुक झालेले पाहायला मिळाले.नितीशचे वडिल कुटुंबासह उभे असताना म्हणाले, “खूप वेगळी भावना आहे. आजचा दिवस खास आहे, नितीशचं पहिलं आंतरराष्ट्रीय शतक. खूप खूप जास्त आनंदी आहे.” नितीशच्या बहिणीने भावुक होत त्याच्या शतकाबाबत बोलताना म्हणाली, “खूप आनंदी आहोत, आज सर्व आम्ही इथे त्याचा सामना पाहायला आलो होतो आणि त्याने त्याचवेळेस त्याने शतक झळकावलं आहे, हे शब्दात सांगण्यासारखं नाही. बाबा या शतकासाठी खूप प्रार्थना करत होते.”विराट कोहली नितीश रेड्डीचा आदर्श आहे आणि त्याने नितीशच्या शतकावर उभं राहून त्याचं कौतुक केलं, यावर बोलताना त्याचे वडिल म्हणाले, विराट कोहलीने त्याला सांगितलं खूप कष्ट करायचे आहेत. यानंतर नितीशची आईदेखील भावुक झाली होती आणि तिनेही आनंद व्यक्त केला.भारतीय संघाचा युवा अष्टपैलू खेळाडू नितीश कुमार रेड्डी याने पहिले कसोटी शतक झळकावले आहे. मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर त्याने १७१ चेंडूत शतक झळकावले. या मालिकेतील पहिल्या सामन्यातून रेड्डीने भारताकडून कसोटी पदार्पण केले. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. नितीश कुमार रेड्डीने चौकार मारून शतक पूर्ण केले. ९९ च्या धावांवर असताना त्याने स्कॉट बोलंडच्या चेंडू सीमारेषेबाहेर पाठवला. तो ९९ धावांवर असताना नववी विकेट पडली होती. यानंतर सिराजने आपली विकेट टिकवून नितीश शतक पूर्ण करण्यात मदत केली. रेड्डी क्रीजवर आला तेव्हा भारताची धावसंख्या ६ विकेट्सवर १९६ धावा होती. यानंतर त्याने १७३ चेंडूचा सामना करताना १० चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने पहिलंवहिलं शतक पूर्ण केलं. नितीश कुमार रेड्डी यांना पाठिंबा देण्यासाठी त्यांचे वडील मुत्याला रेड्डीही मेलबर्नला पोहोचले होते. ते स्टेडियममध्येच उपस्थित होते. शतकापूर्वी, कॅमेरे सतत मुत्यालावर लक्ष केंद्रित करत होते आणि ते खूपच चिंतेत असलेले दिसत होते. जेव्हा नितीश कुमार रेड्डीने चौकारांसह शतक पूर्ण केले तेव्हा त्यांचे वडील भावूक झाले. त्यांनी हात जोडून आकाशाकडे पाहिले. यावेळी ते भावूक झाले आणि त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू डोळ्यात तरळले. त्यावेळी नितीशचे काकाही वडिलांसोबत एमसीजीमध्ये उपस्थित होते. ज्याचा व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे.

### भारत अजूनही 116 धावांनी मागे

नितीश कुमार रेड्डीने चौकार मारून शतक पूर्ण केले. ९९ च्या धावांवर असताना त्याने स्कॉट बोलंडच्या चेंडू सीमारेषेबाहेर पाठवला. तो ९९ धावांवर असताना नववी विकेट पडली होती. यानंतर सिराजने आपली विकेट टिकवून नितीश शतक पूर्ण करण्यात मदत केली. रेड्डी क्रीजवर आला तेव्हा भारताची धावसंख्या ६ विकेट्सवर १९६ धावा होती. यानंतर त्याने १७३ चेंडूचा सामना करताना १० चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने पहिलंवहिलं शतक पूर्ण केलं.खराब प्रकाशामुळे तिसऱ्या दिवशीचा खेळ लवकर थांबवण्यात आला. खेळ थांबला तोपर्यंत भारताने पहिल्या डावात नऊ गडी गमावून ३५८ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४७४ धावा केल्या होत्या. या बाबतीत भारत अजूनही ११६ धावांनी मागे आहे. नितीश रेड्डीने उत्कृष्ट शतक झळकावले. तो सध्या १०५ धावांवर नाबाद आहे. आतापर्यंत १७६ चेंडूंच्या खेळीत त्याने १० चौकार आणि एक षटकार मारला आहे. मोहम्मद सिराजही दोन धावांवर नाबाद आहे.

# रोहितची कारकीर्द संपुष्टात येईल

## हिटमॅनबद्दल ऑस्ट्रेलियाच्या माजी खेळाडूचं मोठं वक्तव्य

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये भारतीय कर्णधार रोहित शर्माकडून अपेक्षित कामगिरी त्याला आतापर्यंत करता आलेली नाही. रोहित शर्मा मालिकेतील पहिल्या कसोटीनंतर संघात सामील झाला असून आतापर्यंत त्याची बॅट तळपलेली नाही. मेलबर्नमधील चौथ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावातही रोहितची बॅट शांत राहिली.**




केवळ तीन धावा करून तो बाद झाला. त्याच्या या खेळीनंतर ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मार्क वॉने मोठे वक्तव्य केले आहे. त्याच्या मते, रोहित शर्माची कसोटी कारकीर्द संपण्याच्या मार्गावर आहे.गेल्या ८ कसोटी सामन्यांमध्ये रोहित शर्माच्या बॅटमधून एकही मोठी खेळी आलेली नाही. गेल्या १४ डावांमध्ये रोहितने ११.०७ च्या सरासरीने केवळ १५५ धावा केल्या आहेत. दुसऱ्या आणि तिसऱ्या कसोटी सामन्यात सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना फ्लॉप झाल्यानंतर रोहित मेलबर्नमध्ये यशस्वी जैस्वालसोबत सलामीला आला, पण पहिल्या डावातही त्याची निराशा झाली. यानंतर तो सवालांच्या फेऱ्यात आला आहे.रोहितने आतापर्यंत या मालिकेतील चार डावांमध्ये ५.५० च्या सरासरीने केवळ २२ धावा केल्या आहेत. त्याच्या या कामगिरीबद्दल मार्क वॉ म्हणाला की, रोहित जर उर्वरित सामन्यांमध्ये काही करू शकला नाही, तर त्याची कारकीर्द नक्कीच संपुष्टात येईल. फॉक्स स्पोर्ट्सवर वॉ म्हणाला, ‘जर रोहित शर्मा शेवटच्या तीन डावात काही करू शकला नाही, तर मला वाटते की त्याची कारकीर्द नक्कीच संपुष्टात येईल.

### रोहित शर्माच्या शॉटवर टीका

बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये भारतीय कर्णधार रोहित शर्माकडून अपेक्षित कामगिरी त्याला आतापर्यंत करता आलेली नाही. रोहित शर्मा मालिकेतील पहिल्या कसोटीनंतर संघात सामील झाला असून आतापर्यंत त्याची बॅट तळपलेली नाही. मेलबर्नमधील चौथ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावातही रोहितची बॅट शांत राहिली. ’तसेच माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू केरी ओ’कीफे यांनीही रोहितच्या शॉटवर टीका केली. तो म्हणाला की, त्याच्या डावाच्या सुरुवातीला खेळणे खूप घाईचे होते. तो म्हणाला, ‘रोहित शर्माची ही खरोखरच मोठी चूक होती.